जनसंपर्क कक्ष
16 JUL 2022 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या पदवी, पदव्युत्तर परीक्षांची तयारी पूर्ण

## मंगळवारपासून होणार प्रारंभ : ओएमआर शीट पाठविल्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विविध अभ्यासक्रमांच्या उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर विभागातील परीक्षा शिवाजी विद्यापीठ ऑफलाइन एमसीक्यू (वस्तुनिष्ठ बहुपर्यायी) स्वरूपात होणार आहेत. त्याची सुरुवात मंगळवार (दि. १९) पासून होईल. या परीक्षांची विद्यापीठ पातळीवरील तयारी पूर्ण झाली आहे. विद्या परिषदेच्या मान्यतेनुसार परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून उन्हाळी सत्रातील सर्व परीक्षा ऑफलाइन एमसीक्यू पद्धतीने घेतल्या जाणार आहेत. पहिल्या टप्प्यात बी.एस्सी. एम.एस्सी आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा मंगळवारपासून सुरू होतील. त्यासाठी पर्यवेक्षक नियुक्तीची कार्यवाही पूर्ण झाली आहे.

कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यासाठी प्रत्येकी एका भरारी पथकाची नियुक्ती केली आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व २७६ महाविद्यालयांना परीक्षेसाठी ओएमआर शीट पाठविल्या आहेत. दुसरा टप्पा दि. २७ जुलैपासून सुरू होणार आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी शुक्रवारी दिली.

### ३४९ जणांनी दिली पीएच. डी. प्रवेश परीक्षा

विद्यापीठाने सन २०२१-२०२२ या वर्षासाठी एम. फिल., पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी विशेष मोहिमेंतर्गत शुक्रवारी श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात ऑफलाइन एमसीक्यू स्वरुपात प्रवेश परीक्षा घेण्यात आली.



त्यासाठी एकूण ५२३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. त्यापैकी ३४९ जणांनी परीक्षा दिली. त्यामध्ये अकाउंटन्सी, व्यावसायिक अर्थशास्त्र, कॉमर्स, शिक्षण, इतिहास, इंग्लिश, भूगोल, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, राज्यशास्त्र, हिंदी, मानसशास्त्र, भौतिकशास्त्र, ॲग्रो केमिकल्स अँड पेस्ट मॅनेजमेंट, नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. एम. फिल. पीएच. डी. प्रवेश परीक्षा शनिवारी होणार आहे, अशी माहिती डॉ. जाधव यांनी दिली.

### आकडेवारी दृष्टिक्षेपात

| ६५८ | २ लाख |
|---|---|
| उन्हाळी सत्रातील एकूण परीक्षा | परीक्षार्थींची संख्या |

16 JUL 2022 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचे 'एनआयआरएफ रँकिंग' कायम

## देशातील १०१-१५० रँकबँडमध्ये स्थान : मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडून मानांकन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : नॅशनल इन्स्टिट्युशनल रँकिंग फ्रेमवर्कचे (एनआयआरएफ) मानांकन केंद्र सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने शुक्रवारी ऑनलाईन जाहीर केले. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाने आपले स्थान कायम राखले आहे. गेल्या वर्षीप्रमाणे देशातील विद्यापीठांच्या यादीत १०१-१५० आणि सर्व शैक्षणिक संस्थांच्या यादीतील १५१-२०० या रँकबँडमध्ये विद्यापीठाचा समावेश आहे.

विद्यापीठ अथवा शैक्षणिक संस्थेच्या कॅम्पसवरील परदेशातील विद्यार्थ्यांचे प्रमाण, पेटंट, अध्यापन-अध्ययन पद्धती, निधी खर्चाचे प्रमाण, रोजगार उपलब्धता, आदी विविध निकषांच्या आधारे देशातील सर्व विद्यापीठे आणि शैक्षणिक संस्थांचे मूल्यांकन करून मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडून 'एनआयआरएफ' रँकिंग जाहीर करण्यात आले. त्यामध्ये विद्यापीठाला गेल्या वर्षी इतके मानांकन मिळाले आहे. विद्यापीठाने सन २०१५-१६मध्ये 'एनआयआरएफ' मूल्यांकनामध्ये देशात २८ वा क्रमांक मिळवला होता. त्यानंतरच्या दुसऱ्या वर्षी विद्यापीठाने या मूल्यांकनासाठी अर्ज केला नव्हता. सन २०१७-१८ मध्ये विद्यापीठाने अर्ज केला. त्यानंतर मूल्यांकनाच्या यादीतील १०१-१५० रँकबँडमध्ये विद्यापीठाला स्थान मिळाले. या वर्षीही विद्यापीठाने हे स्थान कायम राखले आहे.

### भारती विद्यापीठ, कृष्णा इन्स्टिट्यूटचा समावेश

या मानांकनात फार्मसी कॉलेज रँकबँडमध्ये भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी कोल्हापूरचा ४०.९१ आणि वैद्यकीय गटातील कऱ्हाड येथील कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स डिम्ड (अभिमत) युनिव्हर्सिटीचा ४९.७६ गुणांसह समावेश आहे.

> शिवाजी विद्यापीठाने एनआयआरएफ रँकिंगमधील स्थान कायम राखले. गेल्यावर्षीइतकेच मानांकन आहे. त्यामध्ये पुढील वर्षी सुधारणा करण्यात येईल.
> - डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरु

पुढारी

# एम.फिल., पीएच.डी. प्रवेश परीक्षेला ३४९ विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या वर्षासाठी एम.फिल., पीएच.डी. साठी विशेष मोहिमेंतर्गत प्रवेश परीक्षेचे आयोजन शुक्रवारी शहाजी छत्रपती महाविद्यालयात करण्यात आले. ५२३ पैकी ३४९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. एम.फिल., पीएच. डी. साठीची प्रवेश परीक्षेमधील प्रश्नपत्रिकेबाबत काही शंका, त्रुटी, आक्षेप असल्यास त्याबाबतची तक्रार विद्यार्थ्यांनी appointmenta@unishivaji ac.in या ई-मेलवर पाठवावी.

पुण्यनगरी

# एम.फिल, पीएच.डी.साठी ३४९ विद्यार्थी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२१-२२ च्या एम.फिल., पीएच.डी.साठी विशेष मोहिमेंतर्गत प्रवेश परीक्षेचे आयोजन शुक्रवारी करण्यात आले होते. श्री शहाजी छत्रपती माहविद्यालयामध्ये ही परीक्षा घेण्यात आली. ५२३ पैकी ३४९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. प्रवेश परीक्षेतील प्रश्नपत्रिकेबाबत शंका, त्रुटी व आक्षेप असल्यास विद्यापीठाशी संपर्क साधण्याचे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. ए. एन. जाधव यांनी केले आहे.

सकाळ

# 'एन.आय.आर.एफ'मध्ये शिवाजी विद्यापीठ कायम

## डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठासही स्थान



. कोल्हापूर, ता. १५ : केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने देशातील शिक्षण संस्थांची 'नॅशनल इन्स्टिट्यूट रँकिंग फ्रेमवर्क यादी आज प्रसिद्ध केली. यामध्ये शिवाजी विद्यापीठाने रँक बँड १०० ते १५० यामधील स्थान कायम ठेवले आहे. सावित्रीबाई फुले विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठ यांच्यासह बारा संस्थांनी यादीत स्थान मिळवले. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी ही यादी जाहीर केली.

शिवाजी विद्यापीठाचे तीन वर्षापासून रँक बँड १०१ ते १५० मधील स्थान कायम आहे. नॅक मूल्यांकनात शिवाजी विद्यापीठ अव्वल असले तरी 'एनआयआरएफ' रँकींगमध्ये पुढच्या क्रमांकाचे स्थान मिळाले नाही. मात्र गेल्या वेळी असणारे स्थान विद्यापीठाने कायम ठेवले आहे. शिवाजी विद्यापीठ संलग्न भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, कोल्हापूरने राष्ट्रीय क्रमवारीत ४७ वे स्थान मिळविले आहे.

> एनआरआयएफ रँकिंगमध्ये विद्यापीठाने स्थान कायम ठेवले आहे. या रँकिंगमध्ये प्रगती करण्यासाठी निश्चित स्वरूपाचा आराखडा तयार केला गेला असून त्यानुसार कार्यवाही सुरू आहे. भविष्यात या रँकिंगमध्ये शिवाजी विद्यापीठ अव्वल स्थान मिळेल असा विश्वास वाटतो.
>
> डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू
> शिवाजी विद्यापीठ